# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २६.०९.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— दरोडा घालणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी सागर विनोद जोहरी, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. ४५, जोहरी व्हिला, डुमरे ले—आऊट, गंगानगर, गिट्टीखदान, नागपुर यांचे कॉफी हाऊस चौक येथे जोहरी वाईन्स नावाचे वाईनशॉप आहे. दिनांक २४.०९.२०२६ चे रात्री दुकान बंद करून, दुकानातील दिवसभर विक्री केलेल्या मालाची कॅश अंदाजे ४,००,०००/—रू. एका लॅपटॉपसह बॅगमध्ये घेवुन, बॅग मागील सिटवर ठेवुन, त्यांचे कार क्र. एम.एच ३१ ई.यु ४००९ ने घरी जात असतांना, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत गोकुलपेठ, कॅनल रोड, गुबरे भवन समोर रात्री २२.५५ वा. चे सुमारास एका लाल रंगाचे कार चालकाने फिर्यादीस ओव्हरटेक करून, त्यांचे गाडीसमोर कार उभी केली व त्यातील दोघांनी खाली उतरून, एकाने मागील दाराचे खिडकीवर मारून काच तोडला व दुसरा फिर्यादीस मारण्याकरीता आला असता, फिर्यादी हे गाडीजवळुन दुर झाले. तेवढ्यात तेथे मोपेड व बाईकवरील आलेल्या ईसमांनी फिर्यादीचे गाडीवर लाथा मारल्या व त्यातील एकाने फिर्यादीस चाकुचा धाक दाखविला व आरोपींनी फिर्यादीची काळ्या रंगाची लेदर बॅग अंदाजे ४ लाख रूपये रोख व लॅपटॉप, हेडफोन असलेली असा एकुण ४,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन तेथुन आलेले सर्व आरोपी पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३१०(२), ३११, ३२४(४) भा.न्या. सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन, गुन्हेशाखा पोलीसांनी फिर्यादीस विचारपुस केली असता, फिर्यादी यांनी तक्रार देतांना रोख रक्कम ४ लाख असल्याचे सांगीतले होते. परंतु ती रक्कम २ लाख ३५ हजार असल्याचे सांगीतले व आरोपींनी एकुण लॅपटॉपसह ३ लाख ५ हजार रूपयाचा मुद्देमाल दरोडा टाकुन नेल्याचे सांगीतले. गुन्हेशाखा पोलीसांनी वेगवेगळे ४ पथके तयार करून, संयुक्तपणे कार्यवाही करून, १५ कि.मी. परीसरातील शासकीय व खाजगी सिसिटीव्ही ची पाहणी करून, एआय तंत्रज्ञानाचे मदतीने व ईतर माहीतीवरून २४ तासाचे आंत आरोपींबाबत माहीती काढुन, आरोपींना निष्पन्न केले. आरोपी १) परवेज प्यारे खान, वय ३१ वर्षे, रा. एकता बॅक कॉलोनी, यादव नगर चौक, यशोधरानगर, नागपुर २) धनंजय ताराचंद आवटे, वय २४ वर्षे, रा. एकता कॉलोनी, गल्ली नं. १, मस्जीद जवळ, यादव नगर चौक, यशोधरानगर, नागपुर ३) मोहम्मद बिलाल ख्वाजा पाशा, वय २९ वर्षे, रा. सेमीनारी हिल्स, वायुसेना रोड, गिट्टीखदान, नागपुर ४) आवेज खान लतीफ खान, वय २१ वर्षे, रा. एकता कॉलोनी, मोहम्मद रफी चौक, यशोधरानगर, नागपुर, ५) मोहम्मद नदीम मोहम्मद ईकबाल, वय २८ वर्षे, रा. गल्ली नं. २, एकता कॉलोनी, यशोधरानगर, नागपुर, ६) मोहम्मद रोमान मोहम्मद ईरफान शेख, वय २० वर्षे, रा. यादव नगर, गल्ली नं. ३, एसकेपी शाळेमागे, यशोधरानगर, नागपुर व दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद दरोड्याचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. गुन्हेशाखा पोलीसांनी २४ तासाचे आंत गुन्हा उघडकीस आणुन, गुन्ह्यातील

०६ आरोपी व ०२ विधीसंघर्षग्रस्त बालकांना पुढील कार्यवाहीस्तव अंबाझरी पोलीसांचे ताब्यात दिले आहे. पुढील तपास वपोनि. विनोद गोडबोले यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे अंबाझरी येथे सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. शुभांगी देशमुख, पोनि. प्रशांत ठवरे, दिलीप चंदन, सपोनि. नितीन चुलपार, चेतन बोरखडे, पोउपनि. विवेक झिंगरे, मनोज राऊत, नवनित नडगिरी, पोहवा. रोशन तिवारी, नितीन वर्मा, प्रशांत गभणे, विलास कोकाटे, अजय शुक्ला, प्रितम यादव, रविंद्र खेडकर, कमलेश गणेर, प्रविण शेळके, सुरेश तेलेवार, अनंता क्षिरसागर, अर्जुन यादव, चंद्रशेखर राघोर्ते, पोअं. पंकज निकम, पराग ढोक, मिथुन नाईक, धिरज पंचभावे, सुधिर पवार, संदीप पांडे, अमन राऊत व आशिष धंदरे यांनी केली.





**२) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.०९.२०२६ चे ०८.१५ वा. चे सुमारास, फिर्यादीच्या आई नामे सौ. एस. जयलक्ष्मी, वय ८६ वर्षे, रा. कृष्णगंगा अपार्टमेंट, सिव्हील लाईन, हिस्लॉप कॉलेज समोर, बोर्ड ऑफीस जवळ, नागपुर ह्या मॉर्निंगवॉक करून, घरी परत जात असतांना, बॅक ऑफ इंडीया समोर रेड क्रॉस रोड, सिताबर्डी येथे त्यांच्याजवळ पांढऱ्या रंगाचे कारचालकाने कार थांबवुन, त्यामध्ये बसलेल्या तिन ईसमांपैकी एकाने फिर्यादीचे आईला पत्ता विचारण्याचे बहाण्याने बोलावुन, त्यांचे गळ्यातील १५ ग्रॅम वजनी सोन्याची चैन किंमती १,५०,०००/—रू. ची जबरीने हिसकावुन पळुन गेले. फिर्यादी करूणाकरराव मधुसुदनराव समेटा, वय ५७ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात सिताबर्डी पोलीसांनी परीसरातील सिसिटीव्ही ची पाहणी करून व गोपनिय माहीतीवरून आरोपींबाबत माहीती काढुन, आरोपीला निष्पन्न केले. आरोपी शेख शाहरूख शेख कलीम, वय ३० वर्षे, रा. न्यु म्हाडा, उप्पलवाडी, कामठी रोड, कपीलनगर, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने वर नमुद जबरीचोरी चा गुन्हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे उस्मान अकबर खान, वय ३५ वर्षे, रा. न्यु म्हाडा, उप्पलवाडी, कामठी रोड, कपीलनगर, नागपुर संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत घरफोडीचा गुन्हा केल्याची तसेच, भंडारा येथे साथीदारासह पेट्रोलपंपावर चोरीचा गुन्हा असे एकुण ०३ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन रोख १९,१००/—रू., सोन्याची चैन वजनी १५ ग्राम, ०१ मोबाईल फोन, स्प्लेंडर प्लस गाडी क्र. एम. एच ४९ बि.एस १८२४ असा एकुण २,५४,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंह पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सुहास राऊत, दुपोनि मनिष कोल्हटकर, पोउपनि. शाम वारंगे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं. शत्रुघ्न मुंढे, प्रशांत भोयर, चेतन शेंडे, नैनिश तलवारे, सचिन भोयर यांनी केली.



**२) मानकापुर पोलीसांची कामगिरी :— प्राणांतिक अपघात करून, पळुन जाणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.०९.२०२६ चे ०२.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मित्र नामे अमनकुमार लालचंद डहारे, वय २१ वर्षे, रा. हजारीपहाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, नागपूर हा जेवणाचे पार्सल घेण्यासाठी त्याचे बर्गमन मोपेड क्र. एम.एच ४९ बी.यु ६६३८ ने पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत फरस चौक येथील नागपुर—सावनेर रोडवरील उडाणपुलावरुन जात असता, मानकापुर रोडकडून कोराडीचे दिशेने जाणाऱ्या पांढऱ्या रंगाचे हुंदाई कार चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे मित्राचे मोपेडला जोरदार धडक देऊन घटनास्थळावरुन पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचा मित्र मोपेडसह खाली पडुन त्याचे डोक्याला व गुप्तांगाला मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले होते. याप्रकरणी फिर्यादी स्वप्निल सुनिल सायरे, वय ३० वर्षे, रा. जयहिंद शाळेजवळ, शिर्के नगर, गुलशन नगर, कळमणा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपी कार चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान मानकापुर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी परिसरातील सिसिटीव्ही फुटेजची पाहणी केली. तसेच, तांत्रीक तपास करून, अपघात करणारे वाहन ह्युंदाई कंपनीची व्हर्ना कार क्र. एम.एच ४९ बि. ०४०४ असल्याचे निष्पन्न केले. वाहनाबाबत अधिक तपास केला असता, नमुर कार चालकाने कारची नंबरप्लेट काढुन, दुरूस्तीकरीता दहेगांव रंगारी येथील एका ऑटोमोबाईल शॉपमध्ये दिल्याचे खात्रीशीर माहीतीवरून आणि सापळा रचुन आरोपी कारचालक नामे अक्षय चिरकुट कडु, वय २३ वर्षे, रा. गाव वेलतुर, तह. सावनेर, जि. नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन ह्युंदाई कंपनीची व्हर्ना कार क्र. एम.एच ४९ बि. ०४०४ जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस

आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हरीश काळसेकर, पोउपनि. अमीत बंडगर, सफौ. राजेश बरणे, पोहवा. राहुल गवई, पोअं. विपीन रक्षे, धिरजकुमार भोपळे, प्रशांत खंडारे, रोशन बागडे यांनी व पो.ठाणे सदर येथील पोअं. विक्रमसिंग ठाकुर यांचे सहाय्याने केली.




**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे ईमामवाडा :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २६.०९.२०२६ चे ०३.०५ वा. चे सुमारास, ईमामवाडा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, एका विनानंबर प्लेटचे काळ्या रंगाचे सुझुकी एक्सेस मोपेडवरील ईसम जो अंगात गुलाबी रंगाचे शर्ट व कत्थ्या रंगाचा हाफ पॅन्ट घालुन असुन, तो आपले जवळ शस्त्र बाळगुन आहे. अशा माहीतीवरून, परीसरात शोध घेतला असता, बैद्यनाथ चौक जवळ, कामगार भवन मागे, कबाडी दुकानाजवळ, रामबाग येथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असतांना त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहील राजेश उके, वय २८ वर्षे, रा. दहीकर झेंड्याजवळ, रामबाग, ईमामवाडा, नागपुर असे सांगीतले. त्याची व मोपेडची झडती घेतली असता, मोपेडचे डिक्कीमध्ये लाकडी मुठ व आवरण असलेली एक लोखंडी पात्याची गुप्ती मिळुन आली. त्यास वाहनाचा नंबर विचारला असता, त्याने एम. एच ४९ डि.बि १९९९ असल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन लोखंडी गुप्ती व मोपड असा एकुण किंमती ७०,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी गुप्ती बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी ना.पो.अं. हरीष कांबळी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. शंकर निलपत्रेवार यांनी आरोपींविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** फिर्यादी श्रीमती शमीम बानो मोहम्मद हनिफ, वय ५३ वर्षे, रा. प्लॉट नं. २८, साईबाबा नगर, खरबी, नागपूर यांनी पोलीस ठाणे वाठोडा येथे तक्रार दिली की, त्याचा मुलगा नामे मोहम्मद फजल राजा मोहम्मद हनिफ, वय २३ वर्षे हा दिनांक ०७.०८.२०२६ चे ०८.०० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—६ फुट २ इंच, केस—काळे, अंगात— शर्ट व पॅन्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलतो. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे वाठोडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



मोहम्मद फजल

स्वा/–

( नितीन चुलपार )

सहा.पोलीस निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.

# अधिसुचना

## भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे

विषय :— भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश.

ज्याअर्थी, नागपूर पोलीस आयुक्तालयात श्री गणेशमूर्तीचे पारंपरिक पद्धतीने पाण्यात विसर्जन होणार आहे. काही इसम हे कृत्रिम तलाव, नैसर्गिक तलाव, नदी, सार्वजनिक विहीर आदी जलस्त्रोतांमधील तरंगत्या किंवा अर्धवट तरंगत्या, बाहेर काढून संकलित केलेल्या, कृत्रिम तलाव स्वच्छ करतांना संकलन करून ठेवलेल्या, त्यांची वाहतूक, व्यवस्थापन करतांना श्रीगणेशमुर्तीचे फोटो घेतात आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता भंग पावेल अशी छायाचित्रे किंवा चलचित्रे समाजमाध्यमांवर प्रकाशित किंवा प्रसारित करतात.

ज्याअर्थी उपरोक्त परिस्थितीत विसर्जनानंतर अशी छायाचित्रे काढणे, प्रकाशित करणे आणि प्रसारित करणे प्रतिबंधित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये त्वरित प्रतिबंधात्मक कार्यवाही व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या विशेष अधिकाराचा वापर करून याद्वारे आदेश देतो की, कोणत्याही इसमाने विसर्जनानंतर कृत्रिम तलाव, नैसर्गिक तलाव, आदी जलस्त्रोतांमधील तरंगत्या किंवा अर्धवट तरंगत्या, बाहेर काढून संकलित केलेल्या मुर्त्या, कृत्रिम तलाव स्वच्छ करताना संकलन करून ठेवलेल्या, त्यांची वाहतूक, व्यवस्थापन करतांना श्रीगणेशमूर्तीचे फोटो काढू नये आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता भंग पावेल अशी छायाचित्रे किंवा चलचित्रे समाजमाध्यमांवर प्रकाशित किंवा प्रसारित करू नये. सदरचा आदेश संपूर्ण नागपूर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक २५.०९.२०२६ रोजी ००.०१ वा. पासून ते दिनांक ०१.१०.२०२६ रोजी २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस ठाणे, सहायक पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लघंन केल्यास संबंधितांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यासाठी संबंधित पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

दिनांक :— २४.०९.२०२६
ठिकाण :— नागपूर शहर

24/09/26.
(विश्वास नांगरे पाटील)
पोलीस आयुक्त,
नागपूर शहर.